जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक २७.१०.२०२५**

महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध केलेला व मानवी जिवीतास हानीकारक असलेला सुंगधित सुपारी/ तंबाखु (गुटखा) असा सुमारे ४६ लाख रुपये किमंतीचा मुद्देमाल सह आरोपी जेरबंद

महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध केलेला व मानवी जिवीतास हानीकारक असलेला सुंगधित सुपारी/ तंबाखु (गुटखा) यांचा साठा करणे व विक्री करण्यास प्रतिबंध केलेला आहे याअनुषंगाने ठाणे पोलीस आयुक्तालयामध्ये मा. पोलीस आयुक्त सो, ठाणे शहर यांनी प्रतिबंधीत सुंगधित सुपारी/ तंबाखु (गुटखा) यांची विक्री अथवा साठा करणा-या विरूदध कठोर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.

दिनांक १८/१०/२०२५ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, निवृत्ती कोल्हटकर कासारवडवली पोलीस स्टेशन यांना मिळालेल्या खात्रीशीर बातमीवरून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कासारवडवली पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार यांनी साई आरती बंगला, तळमजला, कासारवडवली गाव, घोडबंदर रोड, ठाणे याठिकाणी छापा मारून इसम नामे १) निलेश बाबुराव चलवदे, वय. ३५ वर्षे, धंदा. तंबाखु गुटखा विक्री राह - यशराज पार्क, बी विंग, रूम नं. ००१, विजयपार्क समोर, कासारवडवली घोडबंदर रोड, ठाणे प.२) सत्यभान श्रीनिवास बेहरा, वय. ३२ वर्षे, धंदा. गुटखा विक्री, पत्ता- साई आरती बंगला, कासारवडवली ठाणे यांच्या ताब्यातुन विमल, राजनिवास, डायरेक्टर, आर.जे व इतर कंपनीचा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध केलेला व मानवी जिवीतास हानीकारक असलेला सुंगधित सुपारी/ तंबाखु (गुटखा) अवैध रित्या विक्री करीता साठवणुक करून ठेवलेला सुमारे ४५,८४,४२० रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर नमुद आरोपीत विरूध्द कासारवडवली पोलीस स्टेशन गु.र. क्रं. ९२४/२०२५ अन्न सुरक्षा व मानके अधि. २००६ चे कलम २६(२) (१)(४), २७(३), २७(३)(डि) सह वचन कलम ३ शिक्षा कलम ५९(३), सह भा. न्या.सं. २०२३ चे कलम २२३, २७४, २७५, १२३, ३(५) अन्वये दिनांक १९/१०/२०२५ रोजी प्रमाणे नोंद करण्यात आलेला असुन नमुद आरोपीताना दिनांक १९/१०/२०२५ रोजी अटक करण्यात आलेली असुन मा. न्यायालयाने दिनांक २७/१०/२०२५ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर केलेली आहे.

सदर आरोपीतांनी विमल, राजनिवास, डायरेक्टर, आर.जे व इतर कंपनीचा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध केलेला व मानवी जिवीतास हानीकारक असलेला सुंगधित सुपारी/ तंबाखु (गुटखा) बेकायदेशिररित्या पुरवठा करणारे तसेच सदर अवैध व्यवसायामध्ये सहभागी असणा-या इसमांना गुन्हयाच्या तपासात निष्पन्न केलेला असुन त्यांचा शोध घेवुन पुढील कारवाईच्या अनुषंगाने तपास सुरु आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी श्री.प्रशांत कदम, पोलीस उप आयुक्त, परि-५ वागळे इस्टेट, ठाणे, श्री. मंदार जवळे, सहा. पोलीस आयुक्त सो, वर्तकनगर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली कासारवडवली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री. निवृत्ती कोल्हटकर, सपोनिरी/रूमणे, सपोनि मनिष पोटे, श्रेपोउपनिरी सुनिल सुर्यवंशी, सपोउपनिरी/ काटकर, जातक, पोलीस अंमलदार सुशिल परब, अनिल सोनावणे, संदीप तुपे यांनी केलेली आहे. पुढील तपास सपोनि/मनिष पोटे हे करीत आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर